# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/११/२०२५ (शुक्रवार )**

---

## पोलीस स्टेशन उमरेड अपराध क्रं ७६९/२०२५ अंमलीपदार्थ गांजा प्रकरणात गांजा पुरवठा करणारा पाहीजे आरोपी अटक

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १६/१०/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक यांनी उमरेड येथील एक महीला आरोपी वर कारवाई करत १०.१८० किलो ग्रॅम गांजा किंमती २,०२,०८०/—रूपये, वजन काटा, मोबाईल आणि इतर साहीत्य २४५०/— रूपये असा एकुण २,२६,७३०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला होता. नमुद प्रकरणी महीला आरोपी आणि तिला गांजा पुरवणारा नागपुर येथील आरोपी यांचे वर गुन्हा एन.डी.पी.एस कायदयान्वये नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयात दिनांक २०/१०/२०२५ रोजी पोलीसांनी महीला आरोपी हिला अटक केली होती.

**नमुद गुन्हयात उमरेड पोलीसांनी सखोल तपास करीत साखळी पुरावे जोडुन सदर महीलेला गांजा पुरविणारा आरोपी नामे सोनु उर्फ इरफान खान निसार खान, वय ३८ वर्षे, रा. आझाद कॉलनी, दहेलीवाली अम्मा का दरगाह, बडा ताजबाग, याला निष्पन्न करून त्याला दिनांक २८/११/२०२५ रोजी नागपुर येथुन ताब्यात घेतले. आरोपीला अटक करण्यात आली असुन मा.न्यायालयाने दिनांक ३०/११/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

# रामटेक पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील साराईत ५ गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, रामटेक यांनी पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील ५ आरोपीतांना नगापुर जिल्हयातुन हद्दपार केले.**

१) शैलेश गणपत मानकर, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. पंचाळा (बुर्ज), ता. रामटेक, जि. नागपूर २) आत्माराम अमृतजी हिंगणकर, वय ४० वर्ष, वार्ड क्र. २ साटक, ता. पारशिवनी, जि. नागपूर ३) राहुल डुलिचंद परतेती, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. १ साटक, ता. पारशिवनी, जि. नागपूर ४) आशिष अशोक रामेलवार, वय ३२ वर्ष, रा. नगरधन रामटेक आणि ५) अर्जुन बापुराव वाढीवे, वय ४८ वर्ष, रा. पंचाळा यांना नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नमुद आरोपी यांचेवर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद पाचही आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी हे गुन्हे करण्याच्या सवईचे आहे. त्यामुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर ५ आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव रामटेक पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, रामटेक यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून आरोपी १) शैलेश गणपत मानकर, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. पंचाळा (बुर्ज), ता. रामटेक, जि. नागपूर २) आत्माराम अमृतजी हिंगणकर, वय ४० वर्ष, वार्ड क्र. २ साटक, ता. पारशिवनी, जि. नागपूर ३) राहुल डुलिचंद परतेती, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. १ साटक, ता. पारशिवनी, जि. नागपूर ४) आशिष अशोक रामेलवार, वय ३२ वर्ष, रा. नगरधन रामटेक यांना २ दोन महीन्यांकरीता तसेच ५) अर्जुन बापुराव वाढीवे, वय ४८ वर्ष, रा. पंचाळा याला ३ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**



शैलेश गणपत मानकर



आत्माराम अमृतजी हिंगणकर



राहुल डुलिचंद परतेती



अर्जुन बापुराव वाढीवे



**आशिष अशोक रामेलवार**

## दारूबंदी कायादया अंतर्गत गुन्हे दाखल असलेल्या सराईत महीला आरोपीला केले नागपूर जिल्हयातुन हद्दपार

पोलीस स्टेशन देवलापार हद्दीतील देवलापार येथे अवैधरित्या दारू विक्री करणारी महिला आरोपी हिचा विरुध्द देवलापार येथे दारूबंदी कायादया अंतर्गत बरेच गुन्हें दाखल असल्याने सदर महिले विरुध्द देवलापार पोलीसांनी वेळोवेळी दाखल केलेल्या गुन्हयात प्रतिबंधीत कार्यवाही करून देखील तिचे वर्तनात बदल होत नसल्याचे दिसून आल्याने देवलापार पोलीसांनी सदर महिला विरुद्ध हद्दपार प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी रामटेक जि. नागपूर यांचे कडे पाठविला असता सदर महिलेचा हद्दपार प्रस्ताव मंजुर करून नमुद महीला आरोपीला २ महिण्याकरिता नागपुर जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले आहे.

# पोलीस ठाणे केळवद हद्दीतील मौजा तिष्टी (खुर्द) शेत शिवार येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्यांवर २ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन केळवद** :– दिनांक २८/११/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा तिष्टी (खुर्द) शेत शिवार येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन रेड केली असता **मौजा तिष्टी (खुर्द) शेत शिवार, छोटा तलाव नाल्याच्या बाजुला हातभट्टया लावुन दिसल्या. पोलीसांनी नमुद हातभट्टया नष्ट केल्या. आरोपी नामे आशुतोष संजय पवार आणि एक महीला आरोपी दोन्ही रा. (पारधी बेडा) ता.कळमेश्वर जि. नागपुर** यांचे वर कारवाई करत १) ८० लिटर मोहाफुल दारू, ६०० लिटर मोहाफुल सडवा, ड्रम आणि इतर साहित्य असा एकुण ३८,५००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच **आरोपी नामे अविनाश संजय पवार आणि एक महीला आरोपी दोन्ही रा (पारधी बेडा) ता. कळमेश्वर जि. नागपुर** यांचे वर कारवाई करत १) १०० लिटर मोहाफुल दारू, ८०० लिटर मोहाफुल सडवा, ड्रम आणि इतर साहित्य असा एकुण ४५,५००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. **दोन्ही कारवाई मध्ये एकुण ८४,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.** नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीविरुद्ध कलम महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २ गुन्हे नोंदविण्यात आला आहे.



## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १५ गुन्हे नोंद.

दिनांक २८/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, तसेच इतर साहीत्य असा **एकुण ८१,९१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन कन्हान येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे ा १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे १

गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे १ गुन्हा नोंद आहे. . पोलीस स्टेशन अरोली येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे २ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १५ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ७३८० मिली देशी दारू, ७५७ लीटर मोहाफुल दारू तसेच इतर साहीत्य असा एकुण ८१,९१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने